माहितीचा अधिकार

ISO 9001:2008 Certification
प्राप्त महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.
नागरी सुविधा केंद्र
जा.क्र.नासुके/१/कावि/ ८५ /२०१६
दि.१५/०२/२०१६

**विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत महाराष्ट्र शासनाचे आपले सरकार वेबपोर्टलद्वारे प्राप्त होणारे अर्ज / अपिले विहित मुदतीत निकालात काढण्याबाबत. . .**

<u>परिपत्रक</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेशी संबंधित माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत नागरिकांना अर्ज व अपिल करण्याची सोय महाराष्ट्र शासनाचे **आपले सरकार** वेबपोर्टलवर दि.२६ जानेवारी २०१६ पासून सुरु करणेत आलेली आहे.

सबब, या परिपत्रकान्वये सर्व प्रथम अपिलीय अधिकारी व माहिती अधिकारी यांना सुचित करणेत येते की, त्यांनी या प्रणालीव्दारे प्राप्त होणारे अर्ज व अपिल यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार मुदतीत योग्य ती कार्यवाही करून प्रकरणे निकाली काढावीत याबाबत विलंब किंवा हलगर्जी झाल्यास संबंधितांना जबाबदार धरुन कारवाई करणेत येईल.

अधिनियमातील कलम २५ नुसार सादर करावयाचे मासिक अहवालासाठी, Online आणि Manual यांचा एकत्रित मासिक अर्ज व अपिल अहवाल नागरी सुविधा केंद्र विभागाकडे प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपुर्वी सादर करावेत.

आपले सरकार वेबपोर्टलची URL वेबलिंक https://rtionline.maharashtra.gov.in/RTIMIS ही आहे. या वेबलिंकचे युझर आयडी व पासवर्ड सर्व संबंधितांनी माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत उपलब्ध करुन घ्यावेत. आपले सरकार RTI Online प्रणाली वापराबाबतचे प्रशिक्षण शिबीर तातडीने माहिती व तंत्रज्ञान विभागाने आयोजित करावे. सदर संगणक प्रणाली वापराबाबत काही तांत्रिक अडचणी उद्‌भवल्यास त्याबाबत माहिती व तंत्रज्ञान विभागाशी संपर्क साधावा.

(राजीव जाधव)
**आयुक्त,**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

**प्रति,**

सर्व प्रथम अपिलीय अधिकारी व माहिती अधिकारी,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

प्रत,

माहिती व तंत्रज्ञान विभाग.